# आदिवासी भागातील शेळी पालन आर्थिक उदरनिर्वाहाचे माध्यम

**■ यावल । प्रतिनिधी**

डोंगराळ भागातील अतिदुर्गम निसर्गरम्य परिसरात जीवनाची गुजराण करणाऱ्या आदिवासी बांधवांचा कृषी संस्कृती बरोबरच आर्थिक उदरनिर्वाहसाठी शेळीपालन हा मुख्य व्यवसाय बनला आहे. ग्रामीण आदिवासी भाग हा पूर्णपणे डोंगराळ भाग असल्यामुळे ह्या भागात वनस्पती सृष्टी बरोबरच पावसाळ्यातील हिरवे गवत उन्हाळ्यात वाळलेले वैराण याची कोणतीही कमतरता नसते. त्यामुळे शेळीपालन हा शेती पूरक व्यवसाय डोंगराळ भागातील आदिवासी बांधव मोठ्या प्रमाणात करीत आहेत. शेळीला (बकरीला) आदिवासी भागात गरीबाची गाय म्हणतात. पूर्वपार परंपरेनुसार चालत आलेला हा व्यवसाय आहे. देशी भागात शेळीच्या अनेक जाती आहेत. उस्मानाबादी,जमनापरी, उस्मानाबादी शेळी ही आदिवासी भागात जास्त टिकत नाही. महाराष्ट्र राज्य कृषी विभागाकडून आदिवासी बांधवांसाठी दहा शेळ्या आणि एक बोकड ही योजना लागू केलेली आहे. मात्र जास्त पावसाअभावी ह्या वातावरणात उस्मानाबादी शेळ्या जगु शकत नाही त्यामुळे ग्रामीण भागातील आदिवासी बांधवांना 'गावरान' शेळी पालन हाच



एकमेव पर्याय आहे आज गावरान बोकड आदिवासी भागात आठ ते दहा हजार रू किंमतीला विकला जातो.

आदिवासी भागात शेळ्यांच्या गोठ्याला गोधनी म्हणतात. हा गोठा पूर्णपणे मोकळा असतो. मध्यभागी माच करावा लागतो. एकेका शेळीला (बोकडीला) साधारण दोन ते तीन पिल्लांना जन्म (येजले) देत असते. आदिवासी भागात लहान नर करडाला 'लवारा' तर मादिला 'पाठ' किंवा लहान बकरू म्हणतात. बोकड वाढीसाठी सहा महिने लागतात. त्यामुळे आदिवासी बांधव आर्थिक उदरनिर्वाह करतात. शेतीच्या कामासाठी भात रोपणीसाठी बोकड्याचा वाटा खाऊन शेतमजूर दिवसभर काम करतात. आदिवासी कवी. देवदत्त चौधरी कोकणा बोलीतील एका कवितेत म्हणतात.

बोकड्याचे आहळ्यावर फार जण पिजेल,
गऱ्याचा भात लावाय बोकड्या मग भुजेल

दिवसभर काम करून दमल्यानंतर (भंगवल्यानंतर) संध्याकाळी ओढ्यावर (वहळालं) एखाद्या खडकावर जाऊन बोकड्या भाजण्याचा कार्यक्रम करतात. बोकडाची रक्ती पातेल्यात(भगुण्यात) काढून घेतात लवकर शिजणाऱ्या भागाला पाऊळ म्हणतात. रक्ती, फुफ्फुस, काळीज, सातपुड्या,वाळा, मेंदू पळसाच्या पानात डोना करून सर्व अवयव नमक (गार) टाकून शिजवतात नंतर पळसाच्या पानात रस्सी पीतात. ती अतिशय रुचकर लागते.

आदिवासी डोंगराळ भागात गुराखी(बाळदी) शेळ्या रानात चारण्यासाठी नेतात त्याला 'खांड' म्हणतात. शेळ्या ह्या जंगलातील वेगवेगळ्या वनस्पतींना सुंगून(हुंगाऊन) पाला खात असतात. त्यामुळे त्या विषारी नाग किंवा इतर साप चावल्या नंतरही मरत नाही. मात्र विंचवापासून शेळ्यांना थोडा धोका असतो. डोंगराळ भागात कडे कपारी वेगवेगळ्या वनस्पती व गवताने सपाट माळरान भरलेली असतात. आदिवासी डोंगराळ भागातील शेळ्या हराळी,सोडी,टणटणी, चाईचा मोहर,पीकलेली उंबर फळ, तुरडा गवत,ज्वारी,मका पान,कारवीचा हिरवा पाला बी(मळ) बोकडवेल, खरबाट,पायर, यहंगळ,बीवला,बेंदर वेलीचा पाला याशिवाय मोहाची फुलं,बेहड्याची फळं (भोरगट)भोकरची फळं मोठ्या प्रमाणात खातात.नागली पीकाची कणस खाण्यासाठी लांबून धाऊन जातात. मात्र डाडारडु ( जंगलात आढळणारा रान काडक्यांचे घर करून लपलेला एक किडा) जास्त प्रमाणात हिरव्या गवतात आढळतो. तो शेळ्यांनी अचानक खाल्यास धोका असतो (पोट फुगते). शेळ्यांच्या केसात (बुऱ्यात) रानातील रान गोखरू जास्त प्रमाणात गुंतून राहते त्यामुळे दक्षता घ्यावी लागते. शेळ्यांचे दूध कोडई झाडाचा चिक टाकून मुरवतात. शेळीचे दूध चहात वापरतात, दुधापासून पनीर बनवले जाते, बकराचे मटण,सुप आयुर्वेदिक मानले जाते आदिवासी भागातही काही ठिकाणी खेडोपाड्यात बंदिस्त शेळीपालन व्यवसायही केला जातो अशी माहिती आदिवासी संशोधक सुभाष कामडी यांनी दिली आहे.

# बोदवड शहरात सात लाखांची घरफोडी; पोलीस तपास सुरू

**■ बोदवड । प्रतिनिधी**

बोदवड शहरातील जिजाऊ नगरातील, भारतीय रेल्वेतील सेवानिवृत्त अधिकारी यांच्या घरातून सुमारे सात लाख रुपयांचा ऐवज लुटून नेण्यात चोरट्यांना यश आले आहे. यासंदर्भात बोदवड पोलिसात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला असून, पोलीस कसोशीने तपास करीत आहेत. सेवानिवृत्त रेल्वे कर्मचारी दिलीप डांगरे,हे सकाळी मुलीला भुसावळ रेल्वे स्थानकावर सोडण्यासाठी गेल्यानंतर घर बंद असल्याची संधी चोरट्यांनी साधत सुमारे सात लाखांचा ऐवज लांबवला.१० रोजी पहाटे पावणेसहा वाजेच्या सुमारास ही घटना घडली. या प्रकरणी बोदवड पोलीसात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. भुसावळ रस्त्यावर जिजाऊ नगरात दिलीप रामदास डांगरे हे सेवानिवृत्त रेल्वे अभियंता वास्तव्यास आहेत. १० नोव्हेंबर रोजी सकाळी पावणेसहा वाजता ते दीपावलीनिमित्त माहेरी आलेल्या मुलीला सोडण्यासाठी भुसावळ रेल्वे स्थानकावर गेले असता चोरट्यांनी संधी साधली. घराच्या दरवाजाचे कुलूप कापून चोरट्यांनी घरात प्रवेश करीत बेडरूममधील कपाट फोडून त्यातील सोन्या- चांदीचे डायमंडचे सहा लाख ४२ हजार रुपये किंमतीचे दागिने चोरट्यांनी लांबवली. डांगरे हे भुसावळ येथून परतल्यानंतर त्यांना घरफोडी झाल्याचे लक्षात आले. त्यांनी तातडीने बोदवड पोलिसांना माहिती दिल्यानंतर पोलीस उपअधीक्षक राजकुमार शिंदे, बोदवड पोलीस निरीक्षक अरविंद भोळे, उपनिरीक्षक सुजित पाटील यांनी पाहणी केली. श्वान पथकाला पाचारण केल्यानंतर श्वान काही अंतरावर घुटमळले. बोदवड पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

पान १ वरुन ...

## जलदगती न्यायाइतकेच हेही महत्त्वाचे

कारण मानले जाते. सामाजिक आणि कौटुंबिक मूल्यांची वीण विसविशीत होते आहे. ती घट्ट करणारा परस्पर संवाद हरपला आहे. तो कसा सुस्थापित करता येईल, मूल्यसंस्कार कसे केले जाऊ शकतील यावर विचारमंथन होणे अत्यंत गरजेचे आहे. किती युवांना त्यांच्या भावनांचे नियमन करता येते? किंवा ते कसे करायचे याचे ज्ञान असते? बहुसंख्यांना ते जमत नाही कारण तसे ते शिकवलेच जात नाही. सरधोपटपणेच त्याकडे पाहिले जाते. किंवा तसे मुलांना शिकवायचे असते हेच बहुसंख्य पालकांना माहित नसते. परिणामी भावभावना वेडेवाकडे वळण घेण्याचा धोका बळावू शकतो. समाजमाध्यमांची काळी बाजू त्यात भरच घालणारी ठरते. सामाजिक विकासात आणि कौटुंबिक बांधिलकीसाठी युवांचा सर्वांगिण व्यक्तिमत्व विकास मैलाचा दगड ठरतो. तो त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करतो. तो कसा साध्य होऊ शकेल यावरही काम होणे काळाची गरज आहे. जलदगती न्यायाइतकेच तेही महत्वाचे आहे.

**टायटल व्हेरीफीकेशनकामी जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या नोटीसीने कळविण्यात येते की,
मिळकतीचे वर्णन – **तुकडी जिल्हा नंदुरबार,** पोट तुकडी **तालुका नंदुरबार** पैकी **मौजे नंदुरबार** या गावचे शिवारातील मिळकत **यांसी सर्व्हे / गट नं. ४१४/ पै** यांसी धारणाप्रकार भो वर्ग २ (नविन अविभाज्य शर्त) यांसी क्षेत्र ०२ हेक्टर ०० आर यांसी आकार रु.१०.०० पैसे हि मिळकत यांसी चतु:सिमा रेकॉर्ड ऑफ राईट्सप्रमाणे.

उपरोक्त मिळकती ह्या **श्री. प्रविण विश्राम भदाणे** यांचे मालकी हक्काची व कब्जे वहीवाटीची असल्याचे सांगुन, सदर मिळकत हि निर्वेध व बिनबोजाची असल्याची खात्री व भरवसा देवुन सदर मिळकतीचे टायटल व्हेरीफीकेशनकामी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द केलेली आहे.

सबब सदर मिळकतींवर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा मालकी हक्क, जप्ती हितसंबंध, करार मदार, मुखत्यारनामा अथवा गहाण, दान, लिन, लिज, अन्नवस्त्र, जामीनकी, कोर्टवाद, बँक, संस्था, बोजा व इतर अन्य स्वरुपाची जडजोखीम असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन **१५ (पंधरा) दिवसांचे आत** आमचे खालील पत्यावर साक्षांकीत कागदपत्रांसह, लेखी पुराव्यांसह लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजुन पक्षकारांना त्याबाबतचा दाखला दिला जाईल. याची नोंद घ्यावी. कळावे..
हि टायटल व्हेरीफीकेशनकामी जाहीर नोटीस,

**नंदुरबार**
**दि.१३/११/२०२४**

सदर नोटीस प्रसिध्द करण्यास कोणतीही हरकत नाही.
**सही**
**प्रविण विश्राम भदाणे**

**सही**
**ॲड. सुधाकर रघुनाथ पगार,**
**ॲड. महेश दत्तात्रय घोंगाणे**
पत्ता- चेंबर नं.४०१/१, मारुती चेंबर्स, जिल्हा न्यायालय आवार, नाशिक
मो.नं. ९४२०००३९१०

# कापूस वेचून घराकडे परतणाऱ्या मजूर महिलांचे ट्रॅक्टर पलटी

## ट्रॅक्टर चालकासह मजूर १३ महिला गंभीर जखमी

**■ मलकापूर । प्रतिनिधी**

शेतात कापूस वेचणी करणाऱ्या शेतमजूर महिलांना घराकडे घेऊन येणाऱ्या ट्रॅक्टर ट्रॉली सह पलटी झाल्याने १३ महिला गंभीर जखमी झाल्याची घटनाघटना आज सायंकाळी सहा वाजे दरम्यान ग्राम विवरा शिवारात घडली.

याबाबत सविस्तर वृत्त असे की ग्राम झोडगा येथील शेतमजूर महिला विवरा येथील वासुदेव किसन भोगे यांच्या शेतात कापूस वेचण्यासाठी ट्रॅक्टरने गेल्या होत्या दिवसभर शेतात कापूस वेचून सायंकाळी पाच वाजे दरम्यान घराकडे परतत असताना प्रल्हाद बोरले विवरा यांचे शेताजवळ ट्रॅक्टर ट्रॉली पलटी झाली. यात ट्रॅक्टर चालक प्रवीण वासुदेव भोगे सह ट्रॉली मधील तेरा शेतमजूर महिला जखमी झाल्या या जखमींना विवरा चे ग्रामस्थ राजेशसिंग राजपूत, वासुदेव भोगे, बाळू भागलकर, अमित राजपूत सह आदींनी त्यांना उपजिल्हा रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले.या ट्रॅक्टर पलटी अपघातात संगीता गजानन मोरे (वय ४०), प्रमिला शंकर वराडे (वय ६०), उषा नारायण वेरूळकर (वय ४०), राधाबाई पुंडलिक भारंबे (वय ६५), सुनंदा माणिकराव चव्हाण (वय ३०), बेबाबाई नामदेव आव्हाड (वय ६५), प्रमिला लक्ष्मण सोळंके (वय ३०), ताईबाई साहेबराव निकाळजे (वय ३०), वंदना राजेंद्र खडसे (वय४०), सविता वैभव खडसे वय २२,सरला गणेश भोळे (वय ३५), सुषमा शांताराम अहिरे (वय ४०),उषा रमेश निकाळजे (वय ३५) सर्व रा.झोडगा अशा एकूण १३ शेतमजूर महिला गंभीर जखमी झाल्या. या गंभीर जखमींवर उपजिल्हा रुग्णालयाच्या डॉ .स्वाती पाटील यांनी प्राथमिक उपचार करण्यास सुरुवात केली.

# मोहराळे शिवारात एकाचा मृत्यू

**■ मोहराळा ता. यावल । वार्ताहर –**



मोहराळा ता. यावल येथील २२ वर्षीय तरुणाचा शेतात औत हाकताना हृदयविकाराच्या झटक्यात मृत्यू झाल्याची घटना मंगळवार, दि.१२ बारा रोजी सकाळी घडली मोहराळे येथी चेतन संजय पाटील (वय २२ वर्षे) हा दिनांक १२ रोजी त्याचे मोहराळे शिवारातील शेतात औत हाकत असताना त्याला सकाळी अचानक हृदयविकाराचा झटका आला. त्यात तो मयत झाला. त्याला तत्काळ यावल येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# निसस फायनान्स सर्व्हिसेस कंपनी लिमिटेडला बीएसईकडून तत्त्वतः मंजुरी

**■ मुंबई । प्रतिनिधी–**

बॉम्बे स्टॉक एक्सचेंजने (बीएसई) निसस फायनान्स सर्व्हिसेस कंपनी लिमिटेडच्या रेड हेरिंग प्रॉस्पेक्टसच्या मसुद्याला आयपीओसाठी मंजुरी दिली आहे. आयएफएससी-गिफ्ट सिटी, डीआयएफसी-दुबई आणि एफएससी-मॉरिशस सारख्या महत्त्वाच्या वित्तीय केंद्रांमध्ये फंड सेटअप वाढविणे, अतिरिक्त परवाने मिळविणे आणि सुविधा आणि निधी व्यवस्थापनाच्या पायाभूत सुविधासुधारण्यासाठी ही कंपनी आयपीओद्वारे सार्वजनिक होत आहे. आगामी आयपीओमध्ये एकूण ६५ लक्ष इक्विटी शेअर्सच्या विक्रीची ऑफर आणि प्रत्येकी १० रुपये अंकित मूल्य असलेले ५७ लक्ष ८० हजार इक्विटी शेअर्स जारी करण्याची कंपनीची योजना आहे.

# मानकसिया कोटेड मेटल्स अँड इंडस्ट्रीजचा निव्वळ नफा १५१ टक्क्यांनी वाढला

**■ मुंबई । प्रतिनिधी–**

मानकसिया कोटेड मेटल्स अँड इंडस्ट्रीज लिमिटेड ही कोटेड मेटल उत्पादनांची निर्मिती आणि निर्यात करणारी आघाडीची कंपनी आहे. कंपनीने आर्थिक वर्ष २०२५ च्या पहिल्या सहामाहीच्या आपल्या अनिऑडिटेड फायनाशिअल्सची नोंद के ली आहे.

वित्त वर्ष २५ च्या पहिल्या सहामाहीचे ठळक आर्थक मुद्दे - एकूण उत्पन्न ३७१.९८ कोटी रुपये, वार्षिक वाढ ०.०३ टक्के, एबिटडा २८.६३ कोटी रुपये, वार्षिक वाढ ११.७९ टक्के, एबिटडा मार्जिन (%) ७.७० टक्के, वार्षिक वाढ ८१ बीपीएस, निव्वळ नफा ५.३५ कोटी रुपये, वार्षिक वाढ १५०.६९ टक्के, निव्वळ नफा मार्जिन (%) १.४५%, वार्षिक वाढ ८७ बीपीएस, ईपीएस ०.७२ रुपये, वार्कि वाढ ११८.१८ टक्के.

# धाबे फाटा अपघातप्रकरणी एकाविरुद्ध गुन्हा दाखल

**■ पारोळा। प्रतिनिधी –**

तालुक्यातील धाबे फाट्याजवळ येथे दोन मोटरसायकलींची समोरासमोर धडक होऊन दोन जण जखमी झाल्याची घटना दि. ७ रोजी घडली होती. याबाबत दि.१२ रोजी पारोळा पोलीस ठाण्यात स्वप्नील रमण पाटील यांनी फिर्याद दिल्यावरून मो.सा. क्र MH-१९-EH-७२४२ हिचेवरील चालक दिपक इश्वर बिऱ्हाडे रा. शेळावे खु. ता पारोळा याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या गुन्ह्याचा पुढील तपास हिरालाल पाटील हे करीत आहेत.

## कल्याण

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| २३-०९-२०२४ २८-०९-२०२४ | ११३ ५४ ४०० | ४५९ ८२ २०० | २४७ ३४ २४८ | १७९ ७० २३५ | ३४८ ५७ ३५९ | ५७८ ०३ २५६ |
| ३०-०९-२०२४ ४-१०-२०२४ | १३४ ८५ २३० | ३३० ६४ ६९९ | ७७० ४७ २५० | १७० ८७ ३४० | ११६ ८५ १५९ | २८९ ९७ २५० |
| ०७-१०-२०२४ १२-१०-२०२४ | ४४७ ५८ ३५० | ५७८ ०६ २६८ | ७८० ५१ ३४४ | ५८८ १३ ४९० | २६९ ७४ १५८ | १५७ ३९ २८९ |
| १४-१०-२०२४ १९-१०-२०२४ | १२६ ९१ २४५ | ७८८ ३५ १६८ | ३५० ८२ १३८ | १५९ ५३ १३९ | २३० ५६ ३४९ | १२७ ०७ १२४ |
| २१-१०-२०२४ २६-१०-२०२४ | १७८ ६२ ४८० | १३७ १० १३६ | ६८० ४९ ४७८ | ४५६ ५१ ४७० | ४७० १९ ३७९ | ४५६ ५६ ३६७ |
| २८-१०-२०२४ ०२-११-२०२४ | ४५६ ५६ ३६७ | ● | ● | ● | ● | ● |
| ०४-११-२०२४ ०९-११-२०२४ | ● | ● | ३६९ ८० १३६ | ३४८ ५२ १४७ | १७० ८४ ५९० | २२९ ३९ १४४ |
| ११-११-२०२४ १६-११-२०२४ | १४० ५१ ४८९ | ५७७ ९१ १२८ | २५७ ४१ १३७ | | | |

## मिलन डे / मिलन नाईट

| | मिलन डे | | | | | | | मिलन नाईट | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि | रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
| २३-०९-२०२४ २९-०९-२०२४ | २२६ ०६ ६०० | ३६७ ६३ ५८० | ५६० ११ ३३५ | ६९० ५५ १७७ | ६७८ १५ ३३९ | २८० ०६ ४६६ | ● | ८८९ ५५ २५८ | १६७ ४२ ६६८ | ६८८ २३ ५८० | ७०० ७४ ६८० | १३० ४२ ५८९ | ४५८ ७९ ४६९ |
| ३०-०९-२०२४ ४-१०-२०२४ | २४६ २९ २३४ | ५७० २७ १८८ | ९९९ ७१ २९० | ५६० ११ २९० | ७७८ २७ १६० | ७०० ७५ ८८९ | ● | ४५७ ६६ २४० | १५६ २३ ५८० | १२८ १९ ४६९ | १२५ ८० ५७८ | १४८ ३४ २५७ | १४५ ०५ ७८० |
| ०७-१०-२०२४ १२-१०-२०२४ | १५६ २३ १५७ | १३५ ९४ ७७० | २४५ ११ ९०० | ३७९ ९८ २८८ | ३६६ ५३ ७८८ | ६७७ ०४ ७८९ | ● | ३५६ ४३ ६८९ | २४० ६१ २३६ | ३३० ६१ ४७० | ३४७ ४६ ११४ | १२५ ८८ २२८ | १७९ ७५ ६९० |
| १४-१०-२०२४ २०-१०-२०२४ | ७७८ २१ २४५ | १४७ २२ ३४५ | ५८९ २६ १२३ | १६९ ६९ ४७८ | २४७ ३९ १८० | २७८ ७९ ५६८ | ● | १७९ ७९ २७० | ४४५ ३५ १५९ | ६७९ २९ ३६० | ६७९ २१ १२८ | ४६० ०४ २४८ | १३९ ३१ ३३५ |
| २१-१०-२०२४ २६-१०-२०२४ | १३८ २९ ३७९ | ४८८ ०३ ७८८ | २३८ ३१ ४७० | १४० ५४ १५८ | २९० १५ १४० | १३० ४४ ११२ | ● | १४९ ४९ ४७८ | २५९ ६२ ५७० | १४५ ०२ २३७ | २६८ ६० २८० | ५७७ ९० १९० | १४५ ०९ २८९ |
| २८-१०-२०२४ ०२-११-२०२४ | १३० ४४ ११२ | ● | ● | ● | ● | ● | ● | १४५ ०९ २८९ | ● | ● | ● | ● | ● |
| ०४-११-२०२४ ०९-११-२०२४ | ● | ● | ● | ३७७ ७५ ४५६ | ६७० ३७ ४४९ | ३५० ८७ १७९ | ● | ● | ● | ● | १५५ १३ ११४ | ८९० ७३ २५६ | २५७ ४८ २३३ |
| ११-११-२०२४ १७-११-२०२४ | ८८९ ५१ १०० | १६८ ५८ ११६ | ५५७ ७९ १२६ | | | | | २७८ ७३ ६७० | ३९० २२ ७७८ | ४४६ ४ | | | |

**मंगळवार १२/११/२०२४**
मधुर नाईट -३८०-१९-४७८
धनलक्ष्मी नाईट -
मेन बाजार -६७९-२३-१६६
मिलन ना.-३९०-२२-७७८

**बुधवार १३/११/२०२४**
मधुर मॉर्निंग-७९०-६१-४५०
मधुर डे-५६७-८३-२४७
मधुर नाईट-
धनलक्ष्मी डे-
धनलक्ष्मी नाईट-
मेन बाजार -
कल्याण-२५७-४१-१३७
मिलन डे -५५७-७९-१२६
मिलन ना.-४४६-४

## नशिबाची परीक्षा

गुरुवार १४/११/२०२४

*** मिलन डे ***
१९० २८० २४४ ० – ४ १४९ २३९ ५९२ | सिंगल ०-१-७
जोड ०६-२१-१५-७६-४८

*** कल्याण बाजार ***
१४० २३० ७८० ५ – ८ १७० १८९ ११६ | सिंगल ५-६-४
जोड ५१-०८-६२-७४-८९

*** मुंबई (मेन) बाजार ***
१५६ २४६ ६६० २ – ० १३६ २३५ ५५० | सिंगल २-३-९
जोड २१-८०-६३-९५-०४

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे. कोणीही दुरुपयोग करु नये मो.९९७५४७९८२६

## क्लासिफाईड

### दारुबंदीचा गुरुमंत्र

द ग्रेट साईंटिस्ट... (best doctor & gold medal awarded) डॉ. पालवे ॲडमिट करा... ।। नका करु... पेशंटला सांगा....।। नका सांगू.... पेशंटला आणा.... ।। नका आणू.... * व्यसन पेशंटचे... विश्वास तुमचा... उपचार आमचे... Lifelong व्यसनापासुन १०० टक्के मुक्ती.... सर्व सुविधांनी परिपूर्ण:- * व्यसनमुक्ती Special पॅक, मेडिसीन, इंजक्शन स्प्रे, ड्रॉप, ऑपरेशन, गोळी टाकणे, मंत्रोपच्चार... ॲडमिट सुविधा... * (विशेष) गरीबांसाठी फी मध्ये सवलत... तर आजच संपर्क :- ९५५२६१९७५२. डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. (६४६२/व्ही.एम./०९/०१/२५)(CRINV-2324JL/CRG00555)

### १००% व्यसनमुक्ती

* गॅरंटीने सोडवा. दारु + गुटखा + सिगारेट + बिडी + मावा + तंबाखु + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा + ताडी + स्नेकबाईट + व्हाईट पावडर + व्हाईटनर + हिरॉईन + चरस + कोकेन + एमडी + एल.एस.डी. डॉट पेपर + झोपेची गोळी + इंजेक्शन... डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव मो.९५५२६१९७५२, www. drpalve nashamuktikendra.in १००% रिझल्ट. (६४६३/व्ही.एम./०९/०१/२५) (CRINV-2324JL/CRG00554)

### उपचार सर्वांसाठी सर्व आजारांसाठी

जुनाट सर्दी, जुनाट दमा, जुनाट गुडघे दुखी, चालता, बसता, उठता न येणे. जुनाट संधीवात / चिकन गुनीया, जुनाट ॲलर्जी, जुनाट अर्धशिशी, जुनाट मुळव्याध, एचआयव्ही, भुक लागत नाही?, वजन कमी? थकवा जाणवतोय?, Low CD4 Count? उपचार सर्वांसाठी, सर्व आजारांसाठी. भेटा - अहमदनगरचे सुप्रसिध्द डॉक्टर पालवे, वरणगाव मो.नं. ९५५२६१९७५२ (६४६४/व्ही.एम./ ०९/०१/२५) (CRINV-2324JL/CRG00556)

### देशदूत

धुळे आवृत्तीसाठी छोट्या जाहिरातील रु.५/-प्रतीशब्दाप्रमाणे स्वीकारल्या जातील. शब्दाची किमान मर्यादा १५ व कमाल मर्यादा ४०. सतत तीन दिवस दिल्यास चौथ्या, पाचव्या व सहाव्या दिवशी विनामूल्य. जाहिरातीच्या मजकूर दै. 'देशदूत'च्या छोट्या जाहिरातीच्या फॉर्मवर सुबक अक्षरात लिहून दै. 'देशदूत', 'देशदूत कार्यालय' राणी मेडीकल शेजारी, ग.नं. ६ ,धुळे ४२४००१. संपर्क धुळे-२३७९१४ फॅक्स २३८९१४.

**सूचना**

वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात, त्याची 'देशदूत' वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदाराकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल 'देशदूत' वृत्तपत्र समुहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.